<u>विशेष दरखास्त नं. ३५/२०२३</u>
<u>(जुना विशेष दरखास्त नं.२२/२०२०)</u>

<u>शंकर मारुती चिले वगैरे</u>
<u>विरुध्द</u>
<u>विशेष भूसंपादन तथा उपविभागीय अधिकारी, महाड वगैरे</u>

<u>निशाणी क्र.२३ खालील आदेश</u>

अर्जदार/धनको यांनी एल. आर. नं. ८४/२००३ मधील दिनांक १२/०४/२०१८ चे निकालाचे अनुषंगाने प्रस्तुत दरखास्तमध्ये ऋणको यांनी जमा केलेली रक्कम त्यांना अदा करण्यात यावी, अशी विनंती केली.

०२. अर्ज, अर्जाला ऋणको क्र.१ व २ यांनी निशाणी क्र.२४ व ऋणको क्र.३ यांनी निशाणी क्र.२५ वर दिलेले म्हणणे व सहा. अधिक्षक, वित्त विभाग, दिवाणी न्यायालय व. स्तर अलिबाग यांचे अहवाल वाचले.

०३. अर्जदारातर्फे वकील बी. टी. नवाळे यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. ऋणको क्र.१ व २ तर्फे सरकारी वकील योगेश टेंडुलकर व ऋणको क्र.३ तर्फे वकील वर्षा पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

०४. सहा. अधिक्षक, वित्त विभाग, दिवाणी न्यायालय व. स्तर अलिबाग यांच्या अहवालाचे अवलोकन कराता प्रस्तुत दरखास्तीमध्ये ऋणकोतर्फे दिनांक ०८/०५/२०२३ रोजी एल. आर. नं.८४/२००३ मधील दिनांक १२/०४/२०१८ चे निकालाचे अनुषंगाने **दिवाणी क. क्र. ६२ मध्ये एकूण २,०५,८८,७५१/- (अक्षरी रुपये दोन कोटी पाच लाख अठ्ठयाऐंशी हजार सातशे एकावन्न मात्र) अर्जदार/धनको यांचे नावे जमा केल्याचे व ते आज रोजी जमा असल्याचे स्पष्ट होते.** तसेच अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, अलिबाग यांचा अहवाल (निशाणी क्र.३०) चे

अवलोकन करता एल.ए.आर. रजिस्टरमध्ये प्रस्तुत प्रकरणाबाबत अपीलाची नोंद नसल्याचे दिसुन येते.

०५. प्रस्तुत अर्जांनी अर्जदार/धनको यांनी एकूण जमा रक्कमेपैकी कमीत कमी रकमेच्या हमी बॉण्डवर रक्कम अदा करण्यात यावी, अशी विनंती केली.

०६. याउलट ऋणको क्र.१ ते ३ यांचे कथनाप्रमाणे एल. एल. आर. नं.८४/२००३ मधील दिनांक १२/०४/२०१८ चे निकाला विरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे अपील दाखल केले असुन ते प्राथमिक टप्प्यात असल्याचे सांगितले. अपीलामध्ये वाढीव मोबदल्याची रक्कम कमी होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत, अर्जदार यांच्या हक्कात नुकसान भरपाई रक्कम अदा करताना त्यांच्यावर काही निर्बंध घालावे व एकूण रक्कमेपैकी काही रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये दिर्घ मुदत ठेवीमध्ये गुंतविण्याचे आदेश व्हावेत व हमीपत्र लिहुन घेण्याच्या शर्तीवर रक्कम अदा करण्यात यावे असे कथन केले.

०७. एकुणच ऋणको क्र.१ ते ३ च्या कथनाचे अवलोकन करता अर्जदार/धनको यांनी केलेल्या प्रार्थनेप्रमाणे त्यांच्या हक्कात प्रस्तुत दरखास्तीमधील रक्कम काही अटीशर्तीवर अदा करण्यास त्यांची (ऋणको क्र. १ ते ३) हरकत नसल्याचे स्पष्ट होते. ऋणको क्र.१ ते ३ यांची कथने लक्षात घेता प्रस्तुत दरखास्तीमधील जमा रक्कम अर्जदार/धनको यांना काही अटीशर्तीवर अदा करणे न्यायोचित आहे, असा निष्कर्ष नोंदवून मी खालील आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. धनको यांना एकूण जमा रकमेपैकी ७५% रक्कम, रुपये २००/– च्या बॉण्डवर हमीपत्र घेऊन व ओळख पडताळणी करुन अदा करण्यात यावी.

३. उर्वरित २५% रक्कम धनको यांचे नावे ५ वर्षाकरिता राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये मुदत ठेवीमध्ये गुंतविण्यात यावी.

सही/–
(**पी. एम. उन्हाळे**)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड

महाड
दिनांक : २१/१२/२०२३